आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
२९ ऑक्टोबर २०२५ - बुधवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- इंडिया मेरीटाईम वीक २०२५ मध्ये सहभागी होण्यासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज मुंबई दौऱ्यावर

- मोंथा वादळ पूर्व किनाऱ्यावर धडकलं, वादळाच्या प्रभावामुळे अनेक राज्यांमधे मुसळधार पाऊस

- नीती आयोगाच्या औद्योगिक उत्पादन क्षेत्रातल्या रोडमॅपचं पुण्यात मुख्यमंत्र्यांच्या हस्ते प्रकाशन

- इस्त्रायलनं गाझावर आज केलेल्या हल्ल्यात किमान ३३ पॅलेस्टिनी नागरिक ठार

**आणि**

- भारत आणि ऑस्ट्रेलियाच्या दरम्यान टी-२० सामन्यांच्या क्रिकेट,मालिकेतला पहिला सामना आज कॅनबेरा इथं रंगणार / नाणेफेक जिंकून प्रथम क्षेरक्षणाचा ऑस्ट्रेलियाचा निर्णय

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज मुंबई दौऱ्यावर येणार आहेत. सागरी क्षेत्रात काम करणाऱ्या जगभरातल्या प्रतिनिधींच्या परिषदेला ते संबोधित करणार आहेत. भारत समुद्री सप्ताह २०२५ या नौवहन परिषदेत होणाऱ्या जागतिक सागरी मुख्य कार्यकारी अधिकारी मंचाचं अध्यक्षपदही ते भूषवतील. याविषयी अधिक जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून...

**होल्ड व्हिसी-अंकिता**

*(पाच दिवसांच्या या परिषदेचं उद्घाटन केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या हस्ते २७ तारखेला झालं. केंद्रीय बंदरविकास, जहाजबांधणी आणि जलमार्ग मंत्री सर्बानंद सोनोवाल, रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनीही या परिषदेला संबोधित केलं. परिषदेच्या पहिल्या दिवशी राज्याच्या बंदर विभागानं सागरी व्यापार क्षेत्रात ५६ हजार कोटी रुपयांचे १५ सामंजस्य करार केल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वार्ताहरांशी बोलताना दिली.*

*इंडिया मेरीटाइम वीकच्या दुसऱ्या दिवशी, म्हणजे काल, सोनोवाल यांच्या हस्ते समुद्री वारसा दिनाचं उद्घाटन, तसंच लोथल इथल्या प्रस्तावित राष्ट्रीय समुद्री नौकानयन वारसा संकुलाच्या बोधचिन्हाचं अनावरण आणि संशोधन अहवालाचं प्रकाशन झालं, तसंच विविध देशांच्या सत्रांमध्ये त्यांनी आपले विचार मांडले.*

*परिषदेत ८५हून अधिक देशांतले एक लाखाहून अधिक प्रतिनिधी, तसंच साडेतीनशेहून अधिक आंतरराष्ट्रीय वक्ते सहभागी होणार आहेत. परिषदेच्या पार्श्वभूमीवर विविध देशांसोबत द्विपक्षीय बैठका, सामंजस्य करारांवर स्वाक्षऱ्या इत्यादी कार्यक्रमही आयोजित करण्यात आले आहेत.)*

**<><><><><>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आज राफेल लढाऊ विमानातून उड्डाण केलं. अंबाला इथल्या हवाईदल तळावरुन त्यांनी राफेलमधून आकाशात झेप घेतली. याआधी एप्रिल २०२३मध्ये आसाममधल्या तेजपूर हवाई दल तळावरून सुखोई ३० एमकेआय या लढाऊ विमानातूनही राष्ट्रपती मुर्मू यांनी उड्डाण केलं होतं.

**<><><><><>**

संरक्षणमंत्री राजनाथ सिंग येत्या शनिवारी म्हणजे १ नोव्हेंबर रोजी मलेशियाच्या क्वालालंपूर इथं १२ व्या ए डी एम एम प्लस म्हणजेच आसियान संरक्षणमंत्र्यांच्या परिषदेत सहभागी होणार आहेत. या परिषदेत ते आसियान संरक्षणमंत्र्यांच्या परिषदेच्या १५ वर्षांच्या प्रवासाचं प्रतिबिंब आणि पुढील वाटचाल’ या विषयावर विचार व्यक्त करतील. या दोन दिवसीय दौऱ्यात राजनाथ सिंग, सहभागी देशांच्या संरक्षणमंत्र्यांसोबत तसंच मलेशियाच्या वरिष्ठ नेत्यांसोबत द्विपक्षीय बैठकाही घेणार आहेत. २०२४ ते २०२७ या कालावधीत भारत आणि मलेशिया एकत्रितपणे दहशतवादविरोधी तज्ज्ञ कार्यगटाचे संयुक्त अध्यक्ष आहेत, अशी माहिती संरक्षण मंत्रालयानं दिली आहे.

**<><><><><>**

मोंथा चक्रीवादळ काल रात्री ९० ते १०० किलोमीटर प्रति तासाच्या वेगाने आंध्र प्रदेश आणि यानम इथल्या किनाऱ्यावरून मछलीपट्टणम आणि कलिंगपटणमच्या मधून पुढे सरकलं. किनारपट्टीवर धडकल्यानंतर मोंथाची तीव्रता कमी झाल्याचं हवामान विभागानं म्हटलं आहे. या चक्रीवादळामुळे आंध्र प्रदेशातल्या

श्रीकाकुलम, विशाखापट्टण, नेल्लोर, काकिनाडा जिल्ह्यांमध्ये प्रचंड नुकसान झालं. कोनासीमा इथं सोसाट्याच्या वाऱ्यामुळे झाड पडून एकाचा मृत्यू झाला. वादळामुळे ४८ हजार हेक्टरवरची पिकं आणि जवळपास दीड लाख हेक्टरवरच्या फळबागांना मोठा फटका बसला. रस्ते, विजेच्या तारांचंही मोठं नुकसान झालं. वादळाचा धोका लक्षात घेता ७६ हजारापेक्षा जास्त नागरिकांना सुरक्षित ठिकाणी हलवण्यात आलं आहे.

**ओडिशामध्ये** सोसाट्याच्या वाऱ्यामुळे अनेक ठिकाणी झाडं पडली आणि रस्ते बंद झाले. इथं कोणतंही मोठं नुकसान किंवा जीवितहानी झाल्याचं वृत्त नाही, मात्र काही ठिकाणी दरडी कोसळल्या.

मोंथा चक्रीवादळाच्या प्रभावामुळे महाराषट्रात **लातूर** जिल्ह्यात अनेक ठिकाणी अतिवृष्टी झाली. यामुळे नदी, नाले, ओढ्यांना पूर आला असून विविध प्रकल्पांमधून पाण्याचा विसर्ग सुरू आहे. नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. काढून ठेवलेल्या सोयाबीन पिकांना पावसाचा मोठा फटका बसला आहे.

**तेलंगणमध्ये** राजधानी हैदराबादसह अनेक ठिकाणी जोरदार पाऊस झाला. हवामान विभागानं राज्यातल्या १२ जिल्ह्यांना आज आणि उद्यासाठी ऑरेंज अलर्ट दिला असून मोंथा चक्रीवादळ आत सरकत असल्याने सर्वत्र पावसाचा अंदाज आहे.

या चक्रीवादळामुळे **पश्चिम बंगालमध्ये** राजधानी कोलकाता आणि आसपासच्या भागांत वातावरण ढगाळ असून अधूनमधून पावसाच्या मध्यम सरी कोसळत आहेत. दक्षिण २४ परगणा, पूर्व आणि पश्चिम मेदिनीपूर आणि झारग्राम या जिल्ह्यांमध्ये जोरदार पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे. मासेमारांनी उद्यापर्यंत समुद्रात जाऊ नये, अशी सूचना देण्यात आली आहे.

**तमिळनाडूमध्ये** तीन दिवसांच्या ढगाळ वातावरणानंतर आज सूर्यदर्शन झालं. इथलं जनजीवन पूर्वपदावर येत आहे.

चक्रीवादळाचा परिणाम बिहार आणि राजस्थानातही जाणवत असून तिथे मुसळधार पाऊस होत आहे.

**<><><><><>**

औद्योगिक उत्पादन क्षेत्रात भारताला जगात आघाडीवर आणण्याच्या दृष्टीनं नीती आयोगानं तयार केलेल्या रोडमॅपचं प्रकाशन आज पुण्यात झालं. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, स्पर्धात्मकतेला चालना आणि आर्थिक प्रगती याद्वारे देशातलं औद्योगिक उत्पादन क्षेत्र पुढे नेणं हा या रोडमॅपचा उद्देश आहे. वर्ष २०३५ पर्यंत जीडीपीतलं या क्षेत्राचं योगदान २५ टक्क्यांवर नेणं, १० कोटीपेक्षा जास्त रोजगार निर्माण करणं आणि जगातल्या तीन सर्वोच्च औद्योगिक उत्पादक देशांमध्ये भारताला स्थान मिळवून देणं, हे याचं लक्ष्य आहे. याबरोबरच, जगातली पहिली औद्योगिक उत्पादन संस्था महाराष्ट्रात उभारण्याचा नीती आयोगाचा मानस असल्याची आणि सरकारनं त्याचं स्वागत केल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कार्यक्रमानंतर वार्ताहरांशी बोलताना दिली.

**<><><><><>**

बिहार विधानसभा निवडणुकीसाठीच्या प्रचारानं वेग घेतला आहे. आज छठ उत्सवाच्या समारोपाच्या पार्श्वभूमीवर सर्व पक्षांचे वरिष्ठ नेते आणि स्टार प्रचारकांनी प्रचारसभांचा धडाका लावला आहे. महाआघाडीचा जाहीरनामा काल प्रसिद्ध झाला, त्या पार्श्वभूमीवर दोन्ही बाजूंनी आरोप प्रत्यारोपाच्या फैरी झडत आहेत.

वरिष्ठ भाजपा नेते आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आज बेगुसराय, समस्तीपूर आणि दरभंगा इथं प्रचारसभा घेणार आहेत. तसंच संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांच्या प्रचारसभा पाटना जिल्ह्यात होणार आहेत. भाजपाशासित राज्यांचे मुख्यमंत्री रालोआ उमेदवारांच्या प्रचारासाठी आज बिहारमधे दाखल होत आहेत.

दुसऱ्या बाजूला महाआघाडीच्या उमेदवारांच्या प्रचारासाठी लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी दरभंगा आणि मुझ्झफरपूर जिल्ह्यात सभा घेणार आहेत. तसंच राजद नेते तेजस्वी यादव समस्तीपूर, मधेपूर इथं सभा घेणार असून दरभंगा आणि मुझ्झफरपूर इथं ते राहुल गांधींच्या सभेत सहभागी होतील.

<><><><><>

इस्त्रायलनं गाझावर आज केलेल्या हल्ल्यात किमान ३३ पॅलेस्टिनी नागरिक ठार झाले. हमासनं गाझात इस्त्राएली सैनिकांवर हल्ला केल्यावर आणि मरण पावलेल्या ओलिसांचे मृतदेह परत देण्याचं नाकारल्यावर हे पाऊल उचलल्याचं इस्त्राएलचे संरक्षण मंत्री इस्त्राएल कात्झ यांनी सांगितलं. हमासनं हे आरोप फटाळून लावले आहेत. इस्त्राएलचे प्रधानमंत्री बेंजामिन नेतान्याहू यांनी या हल्ल्याचे आदेश सैन्याला दिले असल्याची माहिती अमेरिकेला दिली होती असं अमेरिकेच्या सूत्रांनी सांगितलं.

<><><><><>

भारत आणि चीन दरम्यान संबंधांमध्ये स्थैर्य राखण्यासाठी प्रत्यक्ष नियंत्रण रेषेवरच्या कोणत्याही समस्या सध्याच्या यंत्रणांच्या माध्यमातून सोडवण्याबाबत उभय देशांचं एकमत झालं आहे. चुशुल-मोल्दो सीमा चौकीवर २५ ऑक्टोबर रोजी झालेल्या २३ व्या भारत - चीन सैन्याधिकारी पातळीवरच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. सीमावर्ती भागात स्थैर्य आणि शांतता कायम असल्याबद्दल उभय देशांकडून या बैठकीत समाधान व्यक्त करण्यात आलं.

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज जपानच्या प्रधानमंत्री सानी ताकाइची यांच्याशी दूरध्वनीवरून संवाद साधला. प्रधानमंत्रीपदाचा कार्यभार स्वीकारल्याबद्दल मोदी यांनी ताकाइची यांचं अभिनंदन केलं, तसंच भारत आणि जपान यांच्यातल्या द्विपक्षीय संबंधांच्या विविध पैलूंवर चर्चा केली. जागतिक शांतता, स्थैर्य आणि समृद्धीसाठी दोन्ही देशांमधले संबंध महत्त्वपूर्ण असल्यावर

दोन्ही नेत्यांचं एकमत झाल्याचं प्रधानमंत्री मोदी यांनी समाजमाध्यमावरच्या संदेशात सांगितलं.

**<><><><><>**

क्रिकेटमध्ये, भारत आणि ऑस्ट्रेलियाच्या संघांदरम्यान ५ टी-२० सामन्यांच्या मालिकेतला पहिला सामना आज कॅनबेरा इथं रंगणार आहे. भारतीय प्रमाणवेळेनुसार दुपारी पावणेदोन वाजता सामन्याला सुरुवात होईल. ऑस्ट्रेलियानं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला आहे.

**//<><><><><>//**